International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.4 Mar–Apr 2020

# सुफी संप्रदाय आणि मराठी साहित्य

**डॉ.माधव मारुती भोसले**

तुकाराम कृष्णाजी कोलेकर

कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नेसरी

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राच्या एकूणच सांस्कृतिक जडणघडणीत महत्वाचे कार्य करणाऱ्या पाच भक्तिसंप्रदायाबरोबरच नंतरच्या कालखंडात निर्माण झालेल्या वीरशैव संप्रदाय, नागेश संप्रदाय व आनंद संप्रदाय इत्यादी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या संप्रदायांपैकी 'सुफी' संप्रदाय या संप्रदायाची पार्श्वभूमी,सुफी संप्रदायाची संकल्पना, सुफी संप्रदायाची परंपरा आणि सुफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान इत्यादी मुद्द्यांच्या आधारे आपण सुफी संप्रदायाची थोडक्यात ओळख या संशोधन लेखनातून करून घेणार आहोत

**सुफी संप्रदायाची पार्श्वभूमी:**

इ.स. दहावे व अकरावे हे शतक भारताच्या राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा कालखंड मानला जातो.मुस्लीम राजा मोहम्मद गझनी च्या नेतृत्वाखाली या काळात संबंध उत्तर भारतभर भयावह आक्रमण रुपी विध्वंस सुरू होता. त्यामुळे भारतीय संस्कृतिक जीवनाला याचा जबरदस्त धक्का बसणे साहजिकच आहे. या कालखंडापूर्वीच दक्षिण भारतातही निराळ्या पद्धतीने इस्लाम राजवटींचे अत्यंत प्रभावी व परिणाम कारक आक्रमण होऊ लागले होते. वास्तविक पाहता व्यापार करण्याचा हेतू ठेवून आलेले दक्षिण भारताच्या प्रांतात आलेले मुस्लिम नंतरच्या काळात मात्र 'सुफी' संप्रदायाच्या रूपाने भारतात धर्मप्रचार आणि प्रसाराचे कार्य अत्यंत सावधपणे करत होते. अल्लाउद्दीन दक्षिण भारतात येण्याच्या अगोदर च्या काळापासून हे सुफी पंथीय लोक महाराष्ट्र आणि कर्नाटकामध्ये आपले धर्मप्रसाराचे काम करत होते. परिणामी प्रभावी आक्रमक मुस्लिम राजांच्या आक्रमणा अगोदरच सुफी संप्रदायातील

साधुनी केलेल्या भारतातील धर्म प्रचाराची बीजे मोठ्या प्रमाणात घट्ट रुजविण्याचे कार्य झाले त्यामुळे एकूणच उत्तर व दक्षिण भारतातील सुफी संप्रदायातील साधूंचा धर्म प्रसार व प्रचाराचे कार्य प्रभावी तर ठरलेच पण त्याची परिणामकारकता संबंध भारताच्या तत्कालीन अध्यात्म व वाङ्मयादी परिस्थितीवर होताना दिसते.

अशा या सुफी संप्रदायाचे महाराष्ट्रातील मुस्लीमांच्या जवळजवळ ४०० वर्षांच्या कालखंडातील सत्तेत‘सुफी’ म्हणजे इस्लाम या मुस्लीम धर्मातील एका संप्रदायाने महाराष्ट्रभर आपले धर्मप्रचार आणि प्रसाराचे जाळे विणण्याचे कार्य केल्याचे दिसते.

सुफी संप्रदायात अशा पद्धतीने धर्मप्रसार व धर्मप्रचार करणाऱ्या लोकांमध्ये काही भेद पडतात. ते असे की सुफी संप्रदायात प्रेममुलकभक्ती मार्गाचा अवलंब करणारे- अध्यात्मक लोक राजकीय आश्रयाने जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणणे, हिंदूंच्या मठ,मंदिरांकडे वाईट प्रवृत्तीने पाहणारे वेगवेगळ्या करामती करून भोळ्याभाबड्या समाजातील असहायीतांना भूल थापा मारून फसविणारे सुफी साधु लोकहीहोते. या सर्वांची चित्रणे तत्कालीन साहित्यातून होताना दिसतात. उदाहरणार्थ समर्थ पूर्व कालखंड किंवा समर्थ कालखंड या कालखंडात या सुफीसंप्रदायातील या दोन्ही प्रवृत्तींचा विशेषतः सुफी धर्मप्रचार व धर्मप्रसाराचा परिणाम तत्कालीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवन व वाङ्मययावर झाल्याचे दिसते.

थोडक्यात सुफी संप्रदाय हा दहाव्या व अकराव्या शतकापासून भारतात प्रवेश करता झाला.मुस्लीम राज्यकर्त्यांच्या भारतावरील आक्रमणा पूर्वीच त्यांनी दक्षिण व उत्तर भारतात आपले धर्मप्रसारक व प्रचाराचे काम सुरू ठेवले होते.मुस्लीम राज्यांच्या ४०० वर्षांच्या महाराष्ट्रातील सत्ता काळात या ‘सुफी’ साधुंनी आपले धर्मप्रचार व प्रसाराचे काम करणे अधिक सोईचे झाले. परिणामी त्यांनी संबंद देशभर आपल्या सुफी संप्रदायाच्या कार्याचे जाळे विणले.

**सुफी संकल्पना :**

इस्लाम या धर्माच्या स्थापनेनंतर जवळजवळ ३०० वर्षांनी सुफी संप्रदायाचा उगम इराणमध्ये झाला. म्हणजेच इस्लाम धर्मातील एक भक्ती संप्रदाय म्हणजे ‘सुफी संप्रदाय’ होय. इस्लाम धर्माचे संस्थापक मोहम्मद पैगंबर यांना दोन प्रकारे साक्षात्कार झाला. त्यातील एका साक्षात्काराचे फलित म्हणजे

कुरान तर दुसऱ्या साक्षात्काराचे फलित म्हणजे समाधी अवस्थेत प्राप्त झालेली गुढविद्या या विधेलाचसुफी संप्रदायाची साक्षात्कारवादी विद्या असे म्हणतात. इस्लामी धर्मशास्त्राला शरियत तर पैगंबरांचा झालेल्या आणि साक्षात्कारावर आधारलेल्या गुढवादी सिद्धांतांना 'तरगीत' म्हटले जाते. या सर्व पातळीवर सुफी संप्रदाय चळवळीचा मूळ स्त्रोत इस्लाम हाच आहे.आणि तो कुराण या धर्मग्रंथात आहे.

**सुफी या शब्दाची व्याख्या :**

१.सुफी म्हणजे बैरागी लोक वापरतात ते लोकरी घोंगडे, ते अंगावर घेऊन वावरणारे ते सुफी.

२.'सुफी' म्हणजे शुद्ध होणे, करणे. शुद्ध आचरण करणारे ते सुफी.

३.'सुफ्फा' म्हणजे मुसलमानांतील गरीब लोक ज्या ओट्यावर नमाज पढतात तो ओटा या 'सुप्फा' वरून त्यांना सुफी म्हटले जाऊ लागले.

४.'सुप् क' म्हणजे रांग. परमेश्वरासमोरील पहिल्या रांगेतील त्यांचे लाडके लोक.[तत्वज्ञान कोश संपा. वाडेकर खं.३]

सुफी सुरुवातीपासूनच गुढवादी प्रवृत्तीचे होते. त्यांना अशा अवस्थेत 'तपस्वी' म्हणून संबोधले जाते.

**सुफींची (संप्रदायाची) परंपरा:**

सुफी ज्या काळात भारतात आले त्यावेळी भारतीय समाज आणि संस्कृती या क्षेत्रावर अद्वैतमताचा प्रभाव पडला होता. त्यांनी हिंदूंच्या उपासनामार्गांना संघटित करण्याचे फार मोठे कार्य त्यांनी केल्याचे दिसते. भारतातील नाथ संप्रदायाचा प्रभाव सुफींवर पडलेला होता. सुफींच्या भक्तिमार्गाचे आकर्षण इथल्या सर्वसामान्यांना होते. सुफी हिंदूंच्या संप्रदायातील योगमार्गाने जरी प्रभावित असले तरी तत्कालीनएतदेशीय हिंदूमधील सर्वसामान्य जनता, उपेक्षित वर्ग हा सुफींच्या भक्तिमार्गाकडे आकृष्ट होत गेलेला दिसतो.सगुण (सुरदास आणि तुळशीदास) तर निर्गुण (कबीर )उपासना मार्ग उदयास आले. पुढे यातून चार संप्रदाय निर्माण झाले. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील

**अली उल हुजवेरी:**

हा (इ.स.1000 ते 1062) या कालखंडातील भारतात आलेला पहिला सुफी प्रचारक होय. नंतरच्या काळात सुफी वादाचे उच्चाटन होऊ लागले. त्यांची अनेक उपासना केंद्रे नष्ट केली गेली. परिणामी सुफी अफगाणिस्थानवरून भारतात आले. त्यांच्यावर येथील अध्यात्मवादाचा प्रचंड प्रभाव पडला.

**सईद बिन अबुल खैर:**

हा देखील (1042)मधील अत्यंत महत्वाचा सुफी प्रचारक होता. त्यांच्या समत्ववादी व एकेश्वरवादी भक्तिमार्गाचा प्रभाव येथील जनसामान्यांवर पडला. वेगवेगळ्या कालखंडात भारतात आलेले त्यांचे चार संप्रदाय पुढीलप्रमाणे

**१.चिस्ती संप्रदाय:**

खाजा मुहिनोद्दीन किस्ती (११४२-१२३६ )याने अजमेरमध्ये चिस्ती या संप्रदायाची स्थापना (११६२) मध्ये शहाबुद्दीन घोरीच्या सेनेबरोबर भारतात येऊन केली. यानंतर कुतुबुद्दिन बखतियार काकी ( इ. स.११८६ ते १२३४ )हा सर्वश्रेष्ठ सुफी धर्मप्रसारक होता. दिल्लीतील कुतुबमिनार हे त्याचे स्मारक होय. त्यानंतर अल्लमश,शेख फरोदोद्दीन गंज शक्कर (इ.स.११७२ ते १२६५ ) हा थोर सुफी सेन होता. अशा अनेक संत व शिष्यांनी मिळून हिंदुस्थानात अनेक ठिकाणी सुफी केंद्रस्थाने स्थापून धर्मप्रचार केला. त्यानंतर निजोमोद्दीन औलिया हा सुफी संत देखील एतदेशीय भारतीयांचे लक्ष वेधून घेतो त्याने इ. स.१२३६ ते १३२५ ) या कालखंडात चिस्ती संप्रदायाच्या माध्यमातून धर्मप्रसाराच्या दृष्टीने निजामोद्दीनचे कार्य अत्यंत प्रभावी आहे.

**२.सुहारावर्दी संप्रदाय:**

या शाखेची स्थापना इराकमध्ये नजीबुद्दीन यांनी सुमारे बाराव्या शतकात केलीबहाऊद्दिन झकारिया (इ.स.११८२-१२६७) या काळात झकारियाने ही शाखा आणली मुलवान हे केंद्र राज्यकर्त्यांच्या माध्यमातून धर्मप्रचार करणारा हा संप्रदाय होता.

**३.कादरी संप्रदाय**

(इ.स ११३४ ते १२३३) बगदाद येथे अब्दुल कादरगिलानी हा एक थोर संत होऊन गेला. त्याच्या नावावरूनच 'कादरी संप्रदाय' म्हणून ओळख असलेल्या या संप्रदायाची हिंदुस्थानात स्थापना करण्याचे

कार्य सय्यद मोहम्मद गौस (१५१७) याने पंधराव्या शतकात केल्याचे दिसते. या संप्रदायामध्ये मोहम्मद मीर दारा शुको, व जहान आरा, नदिरा ही स्त्री संत इत्यादी शिष्य आपल्याधर्मप्रसार व धर्मप्रचारातून हे सुफी संत आपल्या उत्तुंग अध्यात्मिक जीवनाचा प्रभाव सर्वत्र गाजवित राहिले.

**४.नक्शबंदी संप्रदाय:**

या संप्रदायाची स्थापना बाराव्या शतकात ख्वाजाबहा अल्उद्दीन नक्शबंद (इ.स.१३१८ते१३८९) याने तुर्कस्तानमध्ये स्थापना केली व हिंदुस्तानमध्ये या संप्रदायाची स्थापना सोळाव्या शतकात झाली त्याची स्थापना बाकी बिल्ला बेरंग याने केली. इस्लाम तत्त्वाची जवळीक साधणारी त्याची तत्त्वप्रणाली होती ज्ञान आणि गुढवाद यावर त्यांचा भर असून एकेश्वरवाद'वस्तुकल्पनात्मक एकत्त्ववाद' हे या एकेश्वरवादी संप्रदायाचे मुख्य सूत्र होते

**५.सत्तारी संप्रदाय:**

या संप्रदायाचा मुळ संस्थापक 'अबु याजिद अलबिस्मानी' नंतर अब्दुल सत्तारी मात्र इ.स.१४१५ मध्ये या संप्रदायाची शाखा भारतात आणली. हिंदू साधना मार्गाला अत्यंत जवळचा समाज प्रार्थना तत्वज्ञानाचा सुर असणारा हा संप्रदाय अधिक जवळचा आहे.

अशा प्रकारे या पाच संप्रदायात संप्रदायातीलसुफी साधुसंतांनी धर्मप्रसार व धर्मप्रचारकानी भारताच्या कानाकोपऱ्यात सुफीच तत्वज्ञान, नवीन विचार, परंपरा, भक्तीमार्ग यांनेएतदेशीय समाज काहीसा गोंधळून गेलेला असला तरी त्यांनी सबंध भारत व पर्यायाने महाराष्ट्रभर आपल्या कार्याचा विस्तार केल्याचे दिसते. या सर्वच संप्रदायांपैकी कादरी व किस्ती संप्रदायाने भारतात सर्वात अधिक प्रचार आणि प्रसार केला. उदारमतवादी अध्यात्मिक जीवन जगणाऱ्या फकिरी वृत्तीच्या सुफीची परंपरा अत्यंत मोठी होती व ती टिकून होती. नंतरच्या काळात मात्र राजाश्रयाने चमत्कार दाखवणारे करामती करणारे सुफी सर्वत्र धुमाकूळ घालू लागले कारण त्यांना राजाश्रय मिळाला होता.

या सर्व संप्रदायाच्या प्रचार प्रसाराच्या निमित्ताने जे सर्व सुफी संत साधू भारतात आले त्यांनी भारताला आपली कर्मभूमी मानले. इस्लाम हा मूळ गाभा ठेवून आपले आचार व विचारातून एकशास्त्र निर्माण केले त्याला 'तरीकत' म्हणतात. अमीर खुस्रो,मोईनोद्दीन चिस्त्री,कुतुबुद्दिनबख्तियार,फरोदोद्दीन गंज शक्कर व निजामुद्दीन अवलिया व सर्वश्रेष्ठ स्त्री सुपी संत'राबिया' ही एकमेव स्त्री म्हणून या भारतीय सुफी

संतांच्या परंपरेतील एक महत्त्वपूर्ण प्रचारक होती वरील सर्व संत भारतीय सुफी संत होत. यामध्ये अमीर खुस्त्रो हा भारतीय मनावर खूपकाळ आज पावेतो अधिराज्य गाजविणारा संत ठरला. अशी या सुफी संप्रदायातील गुरु शिष्य व धर्म प्रचार-प्रसारकांची परंपरा सांगता येते

**सुफी तत्त्वज्ञान:**

एतद्देशीय भारतीय तत्वज्ञान व सुफी तत्वज्ञान यामध्ये कमालीची एकसूत्रता असल्याचे दिसते. या सर्वात कोणत्या तत्वज्ञानाचा प्रभाव कोणत्या तत्त्वज्ञानावर पडला हे पाहण्यापेक्षा पुढील काळात ख्रिश्चन, बौद्ध व प्लेटो वादाचा प्रभाव त्यांच्यावर पडला.याचा विशेष लक्षणीय प्रभाव पडला तो भारतीय अध्यात्मवादाच्या सुरुवातीच्या काळात देहदंडावर भर देणारा हा संप्रदाय नंतरच्या काळात मात्र भारतीय धर्म पंडितांच्या प्रभावात आल्यानेसुफी संतांनी मानसिकउन्ननयावर भर दिलेला दिसतो. शिवाय भारतीय अद्वेत तत्वज्ञान आता यांचा प्रभाव सुफी वर पडल्यामुळे या दोहोतील तत्त्वज्ञान आणि अध्यात्मात सारखेपणा दिसून येतो. अशा या सुफी संप्रदायाची भूमिका सातत्याने उत्क्रांत होत गेली कालांतराने त्यांच्या तात्विक भूमिकेतूनपाच प्रवाह उदयास आलेले दिसतात.

१.या प्रवाहाचा उगम श्रेष्ठ सुफी संत (अल हल्लाज) हुसेन-बिन -मन्सूर यांच्या विचार कार्यातून झालेला दिसतो. या प्रवाहाच्या मते आत्मा आणि परमात्मा यांच्या एकात्मतेचा घेतलेला ध्यास म्हणजे त्यांचे संपूर्ण जीवन होय

२.'सीना' या सुफी संताने तात्विक विचारांचा दुसरा प्रवाह सुरू केला सर्व काही परमेश्वरात आहे आणि परमेश्वर सर्वाभूती आहे. हे या विचारसरणीचे प्रमुख सूत्र आहे परमेश्वराचे अलौकिक आणि विश्वव्यापक स्वरूप आणि अद्वेतवादी दृष्टी यामुळे हिंदू अध्यात्मवादाला हा विचारप्रवाह महत्त्वाचा वाटू लागला.

३.सुहावर्दीया सुफी तत्वज्ञाने तिसरा प्रवाह प्रचलित केला. ईश्वरात विलीन होईपर्यंत आत्म्याला पुनर्जन्म प्राप्त होतो. या सर्व पातळीवर साधकाची परमोच्च अनुभूती असतेत्या अनुभूतीला या विचारधारेत ‘फना’ असे म्हणतात.

४.चौथा विचार प्रवाह हा 'इब्ज अलअरकीने' प्रसारित केला असून या विचार प्रवाहाच्या मते निसर्ग आणि मानव याने परमेश्वराचे प्रतिबिंब दिसते.अलौकिक भावनाशून्यतेच्या उच्चतम कोटीला पोहोचणे हे या विचारधारेचे प्रमुख सूत्र मानले जाते

५.शेवटची पाचवी विचारधारा ही अब्दुल अल करीमजीनीयाने प्रवाहीत केल्याचे दिसते. या विचारधारेतून हे सर्व विश्व हे परमात्म्याचेच स्वरूप आहे. या रूपाशी एकजीव होणे या सर्वोच्च अवस्थेला या विचारधारेचे महत्त्व असून एकेश्वर वादावर आधारित असणाऱ्या या विचारधारेत उच्च कोटीचा गूढवाद सामावलेला दिसतो.

**संदर्भ ग्रंथ:**


1. ह. श्री. शेणोलीकर: प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
2. रा. गोसावी: पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
3. डॉ.अ. ना. देशपांडे,मं.रा.जोशी : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,व्हीनस प्रकाशन, पुणे.
4. ल.रा. नसिराबादकर: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
5. डॉ. वसंत जोशी: दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास.
6. ल. रा. पांगारकर: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १,२,३.
7. रा.चि. ढेरे: मुसलमान मराठी संतकवी, ज्ञानराज प्रकाशन, पुणे.
8. शं. गो. तुळपुळे(संपा.): प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १. मराठी साहित्य परिषद, पुणे.